| MHKO160001712026 | संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७५/२०२६,<br>नि.क्र. |
|---|---|

<u>श्री. पी. बी. पवार, प्र.व.न्या.दं., मलकापूर-शाहुवाडी यांचेसमोर</u>
<u>राष्ट्रीय लोक अदालत, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक | - | १२/११/२०२५ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | - | १२/११/२०२५ |
| ३ | फिर्यादीचे नाव व पत्ता | - | महाराष्ट्र शासन तर्फे<br>शाहुवाडी पो. ठाणे, जि. कोल्हापुर |
| ४ | आरोपीचे नाव व पत्ता | - | उत्तम महादेव पोवार,<br>व.व. ४५, धंदा- टेलर व्यवसाय,<br>रा.- बोरीवडे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापुर |
| ५ | (ज्याबददल फिर्याद दिली आणि जो अपराघ आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | - | आरोपाचा आशय... |

१. दिनांक १२/११/२०२५ रोजी १३.१५ वाजणेचे सुमारास बांबवडे, ता. शाहुवाडी जि. कोल्हापुर गावचे हद्दीत दुल्हन दुकान शॉपीसमोर तुमचे ताबेतील मारूती सुझूकी गाडी क्र. एम.एच.०९जी.एफ.६०१७ हे वाहन रस्त्यामध्ये धोकादायकरित्या उभे करून सार्वजनिक रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा व धोका निर्माण केला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता २०२३ कलम **२८५** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**(ब)** कलम व अधिनियम – भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८५ प्रमाणे गुन्हा

**(क)** मालमत्तेचे मूल्य – --

**<u>आरोपीचे प्रतिकथन -</u>**

**प्रश्न १** - तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय

उत्तर - होय

**प्रश्न २** - आता तुमचेवर ठेवणेत आलेला चार्ज तुम्हाला मराठीतून वाचून दाखविला व समजावून सांगितला तो समजला काय

उत्तर - होय

**प्रश्न ३** - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय

उत्तर - मला गुन्हा कबूल आहे.

------------

आरोपीची सही

समोर,

Pankaj
Bhimrao Pawar

**स्थळ - शाहुवाडी**
**दिनांक १४/०३/२०२६**

**(पी. बी. पवार)**
**पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत व**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मलकापूर-शाहुवाडी.**

## <u>न्यायनिर्णय</u>

वर नमूद आरोपीविरुध्द पोलीसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८५ अन्वये केस दाखल केली आहे. आरोपीस त्याचे विरुध्द असलेला दोषारोप वाचून दाखविला. तो दोषारोप आरोपीने स्वच्छेने मान्य व कबूल केला आहे. शिक्षेविषयी आरोपीचे म्हणणे असे की, सदरचा गुन्हा त्याच्या हातून प्रथमच घडला आहे व त्याची घरची परिस्थिती हालाखीची आहे, तरी कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली आहे. मा. सरकारी विधिज्ञ यांनी आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

आरोपीचे म्हणण्यामधून आरोपीचे हातून हा गुन्हा प्रथमच घडला आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपीस भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८५ या गुन्हयासाठी दोषी ठरवून रक्कम रुपये **२००/-** (अक्षरी रुपये दोनशे मात्र) दंड व दंड न भरलेस ०१ दिवस साधी कैद अशी शिक्षा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ प्रमाणे सुनावण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत देण्यात यावी.

Pankaj
Bhimrao
Pawar

**स्थळ - शाहुवाडी**
**दिनांक १४/०३/२०२६**

**(पी. बी. पवार)**
**पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत व**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मलकापूर-शाहुवाडी.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | P.A. Vasudeo |
| Name of Court | S. D. Bagal, Panel Head, National Lok-Adalat & Jt. C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi |
| Date of Dictation | 28/09/2024 |
| Judgment signed by the P.O.on | 28/09/2024 |
| Judgment uploaded on | 28/09/2024 |